लोकमत पू. पान क्र. १

# बुरखा घालून आला; डॉक्टरचे २१ लाख घेऊन गेला

## माजी कर्मचाऱ्याचा प्रताप : पोलिसांनी उत्तर प्रदेश व बिहारमधून दोघांना केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** डॉक्टरकडे काम करणाऱ्या माजी कर्मचाऱ्यानेच साथीदाराच्या मदतीने डॉक्टरच्या रुग्णालयातील दालनातून २१ लाखांची रोकड चोरल्याचे उघडकीस आले आहे. काशिगाव पोलिसांनी याप्रकरणी उत्तर प्रदेश व बिहारमधून दोघांना अटक केली आहे.

गोरेगावच्या गोकुळधामजवळ जे. पी. डेक्समध्ये राहणारे डॉ. कपिल प्रमोदकुमार शुक्ला यांचे मीरा रोडच्या विनयनगर भागात राधा नावाचे रुग्णालय आहे.




२० सप्टेंबर रोजी डॉ. शुक्ला हे रुग्णालयात गेले असता त्यांच्या दालनातील लाकडी कपाटातून २१ लाखांची रोख रक्कम चोरीला गेली असल्याचे आढळून आले. सीसीटीव्ही फुटेज तपासले असता बुरखा घालून आलेली व्यक्ती चोरी करताना दिसून आली.

### पोलिसांचा संशय

काशिगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यावर सहायक आयुक्त डॉ. विजयकुमार मराठे व वरिष्ठ निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अभिजित लांडे व किरण बगडाणे यांनी तपास सुरु केला. गुन्ह्याच्या प्रकारावरून त्यात रुग्णालयातील कर्मचारी वा माहिती असलेली व्यक्ती असल्याचा संशय पोलिसांना आल्यानंतर त्यांनी त्याअनुषंगाने तपास केला.

### महिन्यापूर्वी सोडले काम

डॉ. शुक्ला यांचा चालक मनीषकुमार जयश्याम मिश्रा (रा. काशिगाव) याने महिन्याभरापूर्वी काम सोडल्याचे तपासात समजले. मिश्रा हा मूळचा उत्तर प्रदेशच्या प्रतापगढचा होता. पोलिसांनी तपास करून मिश्रा याला उत्तर प्रदेशातून ताब्यात घेतले. त्याच्या चौकशीत २१ लाखांच्या चोरीचा गुन्हा उघडकीस आला. मिश्रा याला पैसे कुठे ठेवले जातात, याची माहिती होती. त्याने रोख चोरण्यासाठी बिहारच्या कटीहार, सिंहीगाव येथील सोनू अल्लाउद्दन शेख याला निवडले. सोनू हा बुरखा घालून रुग्णालयात गेला आणि त्याने ड्रॉव्हर व लाकडी कपाट तोडून २१ लाखांची रोकड चोरली.

# नायगावमधून रिक्षाची चोरी

**नालासोपारा :** नायगावच्या वाकीपाड्यातील कृष्णकुंज बिल्डिंगमध्ये राहणाऱ्या रिक्षाचालक विनोद उपाध्याय (५४) यांची १ लाख ५ हजार रुपये किमतीची रिक्षा चोरीला गेली आहे. शुक्रवारी रात्री बिल्डिंगच्या बाहेर पार्क केलेली रिक्षा चोरट्याने चोरून नेली आहे. नायगाव पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला.

# दुचाकीस्वाराचा अपघाती मृत्यू




**नालासोपारा :** चंदननाका गल्ली नंबर ४ येथे राहणाऱ्या आशिष दुबे (४०) यांचा अपघाती मृत्यू झाला आहे. शनिवारी सकाळी पावणेनऊ वाजता ते दुचाकीने मुंबई-अहमदाबाद महामार्गावरून जात होते. ते दुचाकी निष्काळजीपणे चालवत असल्याने त्यांचा दुचाकीवरील ताबा सुटून यमुना वाइन शॉपसमोरील दोन्ही रस्त्यांच्या मधल्या डिव्हायडरच्या नाल्यात पडून त्यांच्या डोक्याला व तोंडाला मार लागून त्यांचा मृत्यू झाला आहे. नायगाव पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली.

# अपघातात तरुणाचा मृत्यू

**नालासोपारा :** गिरीज येथे राहणारे राकेश चौधरी (२९) आणि शैलेश दांडेकर (२८) हे दोघे २६ सप्टेंबरला रात्री राजोडी येथे त्यांच्या मित्राच्या मुलाचा वाढदिवस साजरा करून दुचाकीने घरी येत होते. शैलेश याने दुचाकी हयगयीने चालवल्याने ते राजोडी क्रॉस नाका येथील लाइटच्या खांब्याला जाऊन धडकल्याने अपघात होऊन दोघेही गंभीर जखमी झाले. या अपघातात शैलेश याचा मृत्यू झाला आहे. अर्नाळा पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

# गळफास घेऊन आत्महत्या



**नालासोपारा :** गौराईपाड्याच्या मुकुंदनगर येथील गणेश पाटील चाळीत राहणाऱ्या पंकज यादव (२१) या तरुणाने आत्महत्या केली आहे. त्याने गुरुवारी रात्री घरातील लोखंडी तुळईला गमछाने गळफास लावून आत्महत्या केली. वालीव पोलिसांनी शनिवारी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

# नोकरी लावण्याच्या नावावर फसवणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईतील धवल अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या मयूर महिडा (वय २७) या तरुणाची मे २०२२ ते ८ जुलै २०२४ यादरम्यान नोकरी लावण्याच्या नावावर फसवणूक झाली आहे. आरोपी मनीष चौहान याने मयूरला मुंबई महानगरपालिका येथे सफाई कामगार म्हणून नोकरी लावण्याचे आमिष दाखवून त्याच्याकडून साडेतीन लाख चेकद्वारे आणि २ लाख रुपये रोख, असे एकूण ५ लाख ५० हजार रुपये घेत आर्थिक फसवणूक केली आहे. माणिकपूर पोलिसांनी शनिवारी गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पृ. पान क्र. १

# बांबू डोक्यात पडून रिक्षाचालकाचा मृत्यू

## इमारतीच्या ७व्या मजल्यावरून पडला बांबू

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** टाकीपाडा रोडवरील लोहार आळीमधील शिवम संकुलच्या बिल्डिंग नंबर १० मध्ये राहणारे रिक्षाचालक संतोष सरगर (वय ४८) यांचा लाकडी बांबू डोक्यात पडल्याने मार लागून शनिवारी मृत्यू झाला आहे.

संतोष सरगर हे १७ सप्टेंबरला त्यांची रिक्षा ही नालासोपारा रेल्वे स्टेशन येथे प्रवासी उतरवुन समेळपाडा येथील दत्तमंदिर रिक्षा स्टँड येथे परत जात होते. समेळपाडा येथील राजू ढगे व फरहान चावरे यांच्या मालकीच्या चावरे टॉवर येथे नवीन बांधकाम चालू असलेल्या इमारती जवळून त्यांची रिक्षा नेत असताना सातव्या मजल्यावरून बांधकामाकरिता वापरण्यात येणारा बांबू त्यांच्या रिक्षावर पडला. यात रिक्षाचे छप्पर फाटून तो बांबू संतोष यांच्या डोक्यावर पडल्याने त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी हॉस्पिटलमध्ये दाखल केले. उपचार सुरू असताना शनिवारी रात्री त्यांचा मृत्यू झाला आहे. नालासोपारा पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद केली आहे.

लोकमत पृ. पान क्र. ५

# टॉवरमधून बॅटऱ्या चोरीला

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालसोपारा :** मांडवी हद्दीतील मोबाइल टॉवरमधून ४८ बॅटऱ्या चोरीला गेल्या आहेत.

तिल्हेर व सायवन गाव येथे असलेल्या इंडस कंपनीचे एयरटेल, जिओ, व्हीआय कंपनीचे सर्व्हर यातील बॅकअप करण्यासाठी लावलेल्या ४८ बॅटऱ्या २४ ते २८ सप्टेंबरदरम्यान चोरीला गेल्या आहेत. चोरट्याने केबिनचे लॉक तोडून ४८ हजार रुपये किमतीच्या ४८ बॅटऱ्या चोरून नेल्या आहेत. ऋषिकेश गुप्ता याने शनिवारी मांडवी पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

लोकमत पृ. पान क्र. ३

# ॲपवरून गाडी भाड्याने घ्यायचा अन् विकायचा

## भामट्यास काशिगाव पोलिसांनी केली अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** ॲपवरून गाडी भाड्याने घेऊन नंतर ती विकायची सांगून लोकांकडून पैसे उकळून त्यांना गंडा घालणाऱ्या भामट्यास काशिगाव पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्यावर फसवणुकीचे चार गुन्हे दाखल आहेत.

मुस्ताफा राशिद खान (रा. नायगाव) हा आपला सेकंड हॅन्ड कारविक्रीचा व्यवसाय असल्याचे सांगत कार घेऊ इच्छिणाऱ्यांना विविध गाड्यांचे फोटो पाठवत असे. नालासोपारा येथे राहणारे जॉन सुभसिंग कागडा यांना सेकंड हॅन्ड कार खरेदी करायची असल्याने त्यांना मुस्ताफा याने गाड्यांचे फोटो पाठवले. सफेद रंगाची गाडी आवडल्याने ३ सप्टेंबर रोजी कागडा यांनी मुस्तफा याला २ लाख रुपये दिले. उर्वरित ४ लाख दिल्यावर गाडी नावावर करतो, असे सांगितले. मुस्तफा याने जालना येथे राहणारे शेतकरी ज्ञानेश्वर चव्हाण (३२) यांच्याशीही त्याच गाडीचा सौदा ६ लाखांत केला व ४ लाख घेतले. उर्वरित २ लाख रुपये आणा व गाडी घेऊन जा म्हटल्याने ४ सप्टेंबर रोजी चव्हाण काशिमीरा नाक्यावर आले. मात्र आरोपी मुस्ताफा पैसे घेऊन पळून गेला होता. त्याचा मोबाइल बंद आला.




### चार गुन्हे दाखल

- यात्रकरणी २६ सप्टेंबर रोजी काशीगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. सहायक आयुक्त डॉ. विजय मराठे व वरिष्ठ निरीक्षक राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक अभिजित लांडे व पथकाने तपास सुरू केला. गाडीच्या क्रमांकावरुन मूळ मालकाचा शोध घेत संपर्क केला असता मुस्तफा याने झूम ॲपद्वारे दोन दिवसांसाठी गाडी भाड्याने घेतली होती, असे समोर आले.
- पोलिसांनी मुस्तफाला अटक केली असून त्याने फसवणूक केल्याचे काशीमीरा पोलिस ठाण्यात २ तर नया नगर आणि कासारवडवलीत प्रत्येकी १ असे ४ गुन्हे दाखल आहेत. गाड्यांची परस्परविक्री करण्याचे प्रकार वाढले असून नागरिकांनी त्यांची गाडी भाड्याने देताना वा ॲप देताना खबरदारी घेण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

पुण्यनगरी पू. पान क्र. ५

# आगमनाप्रीत्यर्थ खड्डे बुजवणे जोरात

## मीरा–भाईंदरमध्ये विकासकामांचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आज लोकार्पण



। **मीरा रोड** : मीरा भाईंदर शहरात विविध विकासकामे सुरू आहेत. काही विकासकामे पूर्ण झाली आहेत. त्या विकासकामांचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सोमवारी लोकार्पण करण्यात येणार आहे. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. मीरा भाईंदर शहरात मुख्यमंत्री येणार असल्यामुळे काही दिवसांपासून मुख्य रस्त्यावर पडलेले खड्डे महापालिकेने रातोरात बुजवले आहेत.

काही दिवसांपासून शहरातील रस्त्यांवर खड्डे पडले आहेत. गणेशोत्सवात खड्डे बुजवले जातील, असे सांगण्यात आले होते. परंतु गणेशाचे आगमन खड्ड्यातून झाले व विसर्जनदेखील खड्ड्यातूनच करावे लागले. तरीही खड्डे बुजवले जात नव्हते. परंतु मीरा भाईंदर शहरात सोमवारी मुख्यमंत्री येणार असल्याने शनिवारी रात्रीपासून शहरातील मुख्य रस्त्यावरील खड्डे बुजवण्यास महापालिकेने सुरुवात केली आहे. शहरातील मुख्य रस्ता व अंतर्गत रस्त्यांची पावसामुळे पडलेल्या खड्ड्यामुळे अक्षरशः चाळण झाली होती. या रस्त्याला केवळ प्रशासनाकडून खडीचा मुलामा देण्यात आला होता. परिणामी स्थानिक रहिवासी त्रस्त झाल्याने तक्रारी करून देखील त्याकडे प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात होते.

रस्त्यावरील खड्डे दुरुस्ती करताना त्यात सर्वात सर्वोच्च पद्धतीचे मास्टिक अस्फाल्ट टाकून खड्डे बुजवले जात आहे, मात्र खड्डे पूर्णपणे खोदून न-भरता वरवर भरण्याचे काम प्रशासनाकडून सुरू आहे. मीरा भाईंदर शहरात खड्डे दुरुस्ती जोरात सुरू असली तरीही राष्ट्रीय महामार्गावर मात्र खड्ड्यांचे साम्राज्य तसेच दिसून येत आहे. यामुळे जनतेचा वेळ, इंधन व वाहनांचे नुकसान आणि डोळ्यात धूळ, कंबरदुखी व सांधेदुखी यांसारख्या आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागत आहे. मीरा भाईंदर शहरात काही महिन्यांपासून शासनाच्या निधीतून विकासकामे सुरू आहेत. ही कामे पूर्ण झाल्यामुळे याचे लोकार्पण करण्यात येणार आहे. घोडबंदर येथील श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा अनावरण, भाईंदर (पूर्व) येथील हिंदुहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे कलादालन लोकार्पण, घोडबंदर किल्ला जतन व संवर्धन, भाईंदर पूर्वेला असलेले निरुपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह इमारत लोकार्पण, भाईंदर (पूर्व) नवघर येथील तलावातील म्युझिकल फाऊंटन लोकार्पण, काशीगाव जरीमरी तलावातील म्युझिकल फाऊंटन लोकार्पण, शासन निधीतून मंजूर झालेल्या विविध कामांचे ऑनलाइन भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते सोमवारी दुपारी करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम निरुपणकार डॉ. आप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह, भाईंदर (पूर्व) येथे आयोजित करण्यात आला आहे.

# नागरिकांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## चार जण अटकेत, नयानगर पोलिसांची कामगिरी



। **मीरा रोड** : येथे दैवी शक्तीचा कॉईन असल्याचे सांगत हा कॉईन घेतला तर यातून मोठा आर्थिक फायदा होतो, असे आमिष दाखवून फसवणूक करणाऱ्या टोळीचा नयानगर पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. याप्रकरणी चारजणांना अटक केली आहे. या आंतरराज्य टोळीने आतापर्यंत कोल्हापूर, ठाणे, वसई, नालासोपारा, चिपळूण, पुणे, लातूर व भांडुप सह मीरा रोड भागात नागरिकांची फसवणूक केली आहे.

मीरा रोड परिसरात दैवी शक्ती (अँटी आयर्न मेकिंग) कॉईन तयार करुन देतो. ते विकत घेतल्यावर बाजारात चांगले पैसे मिळतात. असे भासवून तक्रारदाराकडून ५० हजार रुपये घेऊन फसवणूक केली होती. त्यानुसार नयानगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा नयानगर पोलिसांनी तपास करून कपिल हरीषचंद सिकोरीया (३७, व्यवसाय टेलर, रा. मारू निवास चाळ, बोरिवली) याला ताब्यात घेऊन त्याचे साथीदार सुरज नामदेव मोरे (४१, व्यवसाय टूर्स अँड ट्रॅव्हल्स, रा. क्रॉस गार्डन जवळ, भाईंदर प.) व किरण कालुभाई परमार (३३, व्यवसाय दलाल, रा. न्यू सनराईज बिल्डिंग, आरएमपी पार्क, भाईंदर पूर्व आणि सनी सुहास दत्ता (२४, रा. क्रॉस गार्डनजवळ, भाईंदर प.) यांनाही अटक केली. आरोपींकडे तपास केला असता, त्यांनी लोकांना दैवी शक्ती (अँटी आयर्न मेकिंग) कॉईन विकत घेतल्यावर त्याची बाजारात मोठी किंमत मिळते. हे कॉईन केमिकल वापरून तयार करण्यासाठी पैसे लागतात. आरोपी कोल्हापूर, ठाणे, वसई, नालासोपारा, चिपळूण, पुणे, लातुर, भांडुप येथे लोकांना भेटून त्यांचा विश्वास संपादन करत असत. आणि कॉईन तयार करून देतो, असे आमिष दाखवून त्यांच्याकडून लाखो रुपये उकळत असत.

■ गुन्ह्याच्या तपासात तक्रारदाराव्यतिरिक्त इतर दोघांचीही फसवणूक करून ८ लाख घेतल्याचे निष्पन्न झाले आहे. अशा प्रकारच्या आमिषांना बळी पडू नये. जर कुणाची फसवणूक झाली असल्यास नयानगर पोलीस ठाण्याशी संपर्क करा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

CamScanner

पुण्यनगरी पु. पान क्र. 7

# आजी-माजी आमदारांची खडाजंगी

## ▮ विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मेट्रो कामाचा मुद्दा उफाळला

▮ **मीरा रोड :** विधानसभा निवडणुका डोळ्यांसमोर आल्या असता आमदार गीता जैन व माजी आमदार नरेंद्र मेहता हे मेट्रोच्या कामावरून एकमेकांवर आरोप करत आहेत. मीरा भाईंदर शहरात मेट्रोचे काम सुरू असून, यातील मेट्रोचे काशीगाव येथे स्थानक बनवण्यात येत आहे. माजी आमदार मेहता त्यांच्या सेवन इलेव्हन कंपनीच्या मालकीची जमीन एमएमआरडीएकडे हस्तांतरित करत नसल्यामुळे मेट्रोचे काम रखडले आहे, असा आरोप जैन यांनी केला. त्याला प्रत्युत्तर देताना मेहता म्हणाले की, मी ही जागा देण्यास तयार आहे. त्या जागेचा मोबदला देऊन जागा ताब्यात घ्या, असे अनेकवेळा पत्र पाठवून सांगितले तरीसुद्धा जागा ताब्यात घेत नाही. जैन आयुक्तांवर दबाव टाकून जागा ताब्यात घेऊ नका, असे सांगत असल्यामुळे जागा ताब्यात घेतली जात नाही, असे मेहता यांचे म्हणणे आहे.

विधानसभा निवडणुका जसजशा जवळ येऊ लागल्या तसे शहरातील राजकारण तापू लागले आहे. मीरा-भाईंदर शहरातील मेट्रोच्या रखडलेल्या कामाच्या मुद्द्यावरून आजी आणि माजी आमदार यांच्यात खडाजंगी पाहायला मिळाली. मेट्रोचे काशीगाव स्थानक उभारण्यात येत आहे. हे स्थानक उभारण्यासाठी



आवश्य असलेली जागा माजी आ. नरेंद्र मेहता यांच्या कंपनीची आहे. मेहता जाणीवपूर्वक जागा हस्तांतरित करत नसल्याने मेट्रोचे काम रखडल्याचे आरोप जैन यांनी केला



▪ आ. गीता जैन यांना कोणत्याही प्रकारचे कायद्याचे ज्ञान नाही. त्यामुळे त्या फक्त नागरिकांची दिशाभूल करत आहेत, असे सांगत ती जागा हस्तांतरित होऊ नये, तसेच मेट्रोचे काम रखडले पाहिजे, यासाठी जैन या पालिका आयुक्तांवर दबाव टाकत असल्याचा आरोपही मेहता यांनी केला आहे. जैन यांच्या सोनम बिल्डर यांनी कोणत्या जागा बळकावल्या आहेत, त्यांच्या जागेचे अनेक प्रकरण आहेत. ते बाहेर काढू, असा इशारा मेहता यांनी यावेळी दिला आहे.

आहे. यामुळे प्रत्येक महिन्याला तीन कोटींचा भुर्दंड लागत असल्याचा आरोप आ. गीता जैन यांनी केला आहे.

जैन यांच्या आरोपानंतर माजी आ. नरेंद्र मेहता यांनी पत्रकार परिषद घेऊन यासंदर्भात स्पष्ट केले की, ही जागा ताब्यात घेऊन शासनाने या जागेचा संपूर्ण मोबदला द्यावा, अशी विनंती महापालिका आयुक्तांना अनेकवेळा पत्र देऊन केली. परंतु पालिका प्रशासनाकडून कोणताच प्रतिसाद मिळत नाही. यापूर्वीही शहरातील अनेक विकास प्रकल्पांसाठी सेवन इलेव्हन कंपनीकडून अनेक जागा महापालिकेला हस्तांतरित केल्या. त्या जागेचा मोबदला अद्याप मिळाला नाही, असे मेहता यांचे म्हणणे आहे. आम्ही जागा देण्यास तयार असून, पालिका प्रशासनाने पैसे देऊन जागा घ्यावी, असे मेहता यांनी सुचवले.

पुढारी पु. पान क्र. 3

# जीवदानी मंदिर नवरात्रोत्सवासाठी सज्ज

## मंदिर परिसरात पोलीस बंदोबस्त; भाविकांची होणार गर्दी

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

पालघर जिल्ह्यातील विरार मधील भाविकांच्या श्रद्धेचे स्थान म्हणून जीवदानी मंदिर ओळखले जात. नवरात्रोत्सवात जीवदानी गडावर मोठ्या प्रमाणात भाविक देवीच्या दर्शनासाठी येत असतात. त्यासाठी सुरक्षेच्या दृष्टीने मंदिर प्रशासनाने सर्व तयारी पूर्ण केली आहे. मंदिरावर १५० सिसिटीव्हीच्या माध्यमातून तिसऱ्या डोळ्याची सतत नजर असणारआहे. त्याचबरोबर कोणताही घातपात होऊ नये म्हणून शस्त्रधारी पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. त्याचबरोबर नवरात्रोत्सवात गडावर भाविकांची गर्दी होणार असल्याचंही माहिती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष प्रदीप तेंडोलकर आणि उपाध्यक्ष पंकज ठाकूर यांनी दिली आहे.

मंदिर सुरक्षेचा आढावा ऐटिएसने सुद्धा घेतला आहे. सुरक्षेच्या दृष्टीने ठिकठिकाणी सुरक्षा कवच ही उभारण्यात आले आहे. नऊ दिवस मंदिरात होणारी भाविकांच्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिसांच्या जोडीला विवा



महाविद्यालयाचे २०० एनसीसी विद्यार्थी हजर असणार आहेत. हत्यार बंद पोलिसांची तुकडी तैनात असणार आहे. देवीच्या दर्श नासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दीत लक्षात घेता जीवदानी मंदिरात जण्यासाठी असलेल्या फेनिक्युलरची चाचणीही यशस्वी झाली आहे.



नवरात्राचे ९ दिवस येणाऱ्या भाविकांना महाप्रसादाचे विनामूल्य वाटप करण्यात येणार आहे. नवरात्रीच्या पहिल्या दिवशी गडावर ५० हजारांच्या आसपास भाविकांची गर्दी होइल असा अंदाज वर्तवला जात आहे. नवरात्रोत्सवात येणाऱ्या रविवारी हाच गर्दीचा आकडा लाखांपर्यत जाण्याची शक्यता आहे. त्या दृष्टीने नवरात्रोत्सवाची सर्व तयारी अंतिम टप्प्याचे असल्याचे प्रदीप तेंडोलकर आणि पंकज ठाकूर यांनी सांगितले.

CS CamScanner

सामना पान क्र. 7


- सात ठिकाणांहून विविध डार्क साईटवर व्हिडीओ अपलोड
- परिसरातील स्टुडिओंची कसून झाडाझडती

### महाराष्ट्र राज्य सायबर सेलच्या पत्रानंतर पोलिसांचे धाडसत्र

# मीरा-भाईंदरमध्ये चिमुकल्यांचे लैंगिक शोषण करून चाईल्ड पोर्नोग्राफीचा धंदा

**भाईंदर, दि. २९ ( सा. वा. ) -** चिमुकल्यांचे शोषण करून मीरा-भाईंदर महापालिका क्षेत्रात चाईल्ड पोर्नोग्राफीचा धंदा जोरात सुरू असल्याची धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. शहरातील सात ठिकाणांवरून चाईल्ड पोर्नोग्राफीचे व्हिडीओ विविध डार्क साईटवर अपलोड करण्यात आले असल्याचे पत्र महाराष्ट्र राज्य सायबर शाखेने मीरा-भाईंदर पोलिसांनी दिले आहे. त्यानंतर पोलिसांनी आरोपींना पकडण्यासाठी धाडसत्र सुरू केले आहे. हे सर्व व्हिडीओ या भागातील स्टुडिओमध्ये तयार केल्याचा संशय व्यक्त केला जात असल्याने पोलिसांनी शहरातील संशयित स्टुडिओंची झाडाझडती सुरू केली आहे. याप्रकरणी गुन्हे शाखेने सर्वच पोलीस ठाण्यांना सतर्क राहण्याचे आदेश दिले आहेत.

नॅशनल सेंटर फॉर मिसिंग अ‍ॅण्ड एक्सप्लॉइड चिल्ड्रन (एनसीएमईसी), नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टल (एनसीआरपी) आणि महाराष्ट्र राज्य सायबर शाखा यांच्याकडून चाईल्ड पोर्नोग्राफीवर लक्ष ठेवले जात आहे. या तिन्ही यंत्रणांच्या माध्यमातून विविध वेबसाईट, सर्च इंजिन आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर सॉफ्टवेअरद्वारे प्रतिमांमधील नग्नता शोधली जाते. चेहऱ्याच्या संरचनेद्वारे व्यक्तीचे वय ओळखले जाते. त्यातूनच चाईल्ड पोर्नोग्राफीचे टिप-लाइन अहवाल तयार केला जातो. महाराष्ट्र सायबर शाखेच्या माध्यमातून केलेल्या तपासात मीरा-भाईंदर शहरात मीरा रोड, भाईंदर, अर्नाळा, नालासोपारा, नायगाव आदींसह सात ठिकाणांहून चाईल्ड पोर्नोग्राफीचे व्हिडीओ डार्क वेबसाईटवर अपलोड झाल्याचे पुढे आले आहे. मीरा-भाईंदरमध्ये सुरू असलेल्या या



चाईल्ड पोर्नोग्राफीच्या अड्ड्यांबाबतची माहिती राज्य सायबर शाखेने मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तालयाला पत्राद्वारे दिली आहे. त्यानंतर आरोपींच्या मुसक्या आवळण्यासाठी पोलिसांनी शहरात विविध ठिकाणी धाडसत्र सुरू केले आहे.

पूर्वी अल्पवयीन मुला-मुलींचे व्हिडीओ हे परदेशात बनविले जात होते. मात्र आता ते देशातसुद्धा काही ठिकाणी बनविले जात आहेत. १८ वर्षांखालील मुले-मुली यांच्या पॉर्न व्हिडीओमध्ये रेप, गँगरेप व अश्लील पद्धतीने अंगप्रदर्शन करणे यासारखे दृश्य असतात. मीरा-भाईंदरमधून डार्क वेबसाईटवर अपलोड झालेले व्हिडीओही याच प्रकारचे आहेत. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर महाराष्ट्र राज्य सायबर शाखेचे पोलीस अधीक्षक संजय शिंत्रे यांनी कारवाईसाठी मीरा-भाईंदर पोलीस आयुक्तांशी पत्रव्यवहार केला आहे.

### स्वतः गुन्हे दाखल करा

नालासोपारा, अर्नाळा व नायगावसारख्या भागात असलेल्या बेकायदा स्टुडिओत चाईल्ड पोर्नोग्राफी चालत असेल तर पोलिसांनी स्वतःहून गुन्हे दाखल करा. तक्रारदाराची वाट पाहू नका, असे आदेश गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त अविनाश अंबुरे यांनी सात पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना दिले आहेत. महाराष्ट्र सायबर शाखेने दिलेल्या सूचनांनुसार उपायुक्त अविनाश अंबुरे यांच्यासह सहाय्यक पोलीस आयुक्त मदन बल्लाळ आणि सायबर गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुजित गुंजकर हे नजर ठेवून आहेत. पोलिसांनी संशयित ठिकाणी धाडसत्र सुरू केले आहे.

पुण्यनगरी पृ.पान क्र.५

# राष्ट्रवादी ( शरद पवार गट )
# मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखवणार

**। मीरा रोड :** मीरा-भाईंदर शहरात विविध विकास कामांचे लोकार्पण कार्यक्रमासाठी सोमवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे येणार आहेत. यावेळी शहरातील विविध समस्यासाठी मीरा भाईंदर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने काळे झेंडे दाखवण्यात येणार आहेत.

जिल्हाध्यक्ष विक्रम तारे पाटील आणि कार्याध्यक्ष गुलाम नबी फारुकी यांच्या नेतृत्वाखाली मीरा-भाईंदरमध्ये शहरातील पाणी समस्या, रस्त्यांवरील खड्डे , घनकचरा टेंडर घोटाळा, मालमत्ता करात वाढ, सार्वजनिक शौचालयाचा घोटाळा अशा विविध समस्यांसंदर्भात मुख्यमंत्र्यांना काळे झेंडे दाखवणार असल्याचे निवेदन मीरा-भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तांना देण्यात आले आहे. मुख्यमंत्र्यांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून मीरा रोड पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी गुलाम नबी फारुकी यांना भारतीय नागरीक सुरक्षा संहिता कलम १६८ ची नोटीस दिली असून, कोणत्याही प्रकारचे आंदोलन करू नये, असे सांगितले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष
शरदचंद्र पवार

नवभारत पृ.पान क्र. 2

## भाईंदर में हो रहे भागवत कथा में उमड़ी भक्तों की भीड़

# जो बंट गया वो मिट गया, जो संगठित रहेगा वही शासन करेगा

■ **भाईंदर, (सं).** ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य और शूद्र हम सभी सनातनी हिंदू चार भाई हैं, क्योंकि हम सभी गाय, गंगा और भारत को माता मानते हैं. इन्हें माता मानने वाले सभी भाई हैं. चारों भाई संगठित रहेंगे तो भारत विकसित होगा. अंग्रेजों ने हम चारों भाइयों में फुट डालो और शासन करो की नीति से 200 वर्ष और मुगलों ने 700 वर्ष तक हमें गुलाम बनाया. दुर्गा माता के आठ हाथ हैं, यह आठ हाथ हम चारों भाई के हैं, दुर्गामाता संदेश देती हैं की जिस दिन सनातनी हिंदू संगठित हो गया उस दिन जंगल के शेर को गुलाम बना सकते हैं, इसलिए उनकी सवारी शेर है. जो बंट गया वो मिट गया, जो संगठित रहेगा वही शासन करेगा, उक्त बातें प्रसिद्ध कथा वाचक अनिरुद्धाचार्य महाराज ने विधायक प्रताप सरनाईक द्वारा भाईंदर पूर्व के हिंदुहृदय सम्राट बाला साहेब ठाकरे मैदान में आयोजित 3 दिवसीय भागवत सत्संग सनातन राष्ट्र सम्मेलन में रविवार को दूसरे दिन भागवत कथा के दौरान कही.




### धर्मांतरण को हम मिलकर रोक सकते हैं: अनिरुद्धाचार्य

विश्व में कई ऐसे देश है जो ईसाई देश, मुस्लिम देश हैं, तो भारत हिंदू राष्ट्र क्यों नहीं बन सकता. भारत हिंदू राष्ट्र बनेगा तो गो हत्या बंद होगी, सिर तन से जुदा के नारे नहीं लगेंगे. भारत में तेजी से धर्मांतरण हो रहा है, इसे हम सब मिलकर रोक सकते हैं. हम सभी सनातनी हिंदुओं को प्रतिदिन अपने 23 घंटे घर, परिवार और व्यापार में देना चाहिए, लेकिन एक घंटा गरीबों, आदिवासियों, अज्ञानियों के साथ बैठ सनातन धर्म के बारे में बताना चाहिए, उनसे धर्म पर चर्चा करनी चाहिए.सनातन धर्म की विशेषताएं बताते हुए अनिरुद्धाचार्य कहा कि हिंदू के अंदर दया है, हिंदू पूरे विश्व को परिवार मानता है, पूरे विश्व के कल्याण की प्रार्थना करता है, हमारे यहां क्रांति नहीं संक्रांति होती है, सनातन धर्म में नारी की पूजा होती है, माता पिता, अतिथि, प्रकृति को भगवान माना जाता है. उन्होंने कहा कि हम सनातनी हिंदू लोग सदा अपनी मिट्टी से प्यार करते हैं, इसलिए भारत को माता कहते हैं, प्रणाम करते हैं. यह किसी अन्य धर्म, मजहब में नहीं है. हमारे वेदों पर वैज्ञानिक अनुसंधान (रिसर्च) कर रहे. अमेरिका जैसे देशों में श्रीमद्भागवत गीता की पढ़ाई कराई जा रही है.

नवभारत पृ.
पान क्र. 4

मीरा-भाईंदर में भागवत सत्संग सनातन राष्ट्र सम्मेलन

# CM आज करेंगे विकास कार्यों का उद्घाटन-भूमिपूजन

■ **भाईंदर, (सं).** शिवसेना प्रमुख नेता और महाराष्ट्र के मुख्यमंत्री एकनाथ शिंदे सोमवार को दोपहर दो बजे मीरा भाईंदर शहर में आ रहे हैं. विधायक प्रताप सरनाईक की संकल्पना एवं सतत प्रयास व कड़ी मेहनत से साकार हुए विभिन्न महत्वपूर्ण विकास कार्यों का शिंदे उद्घाटन करेंगे. इससे पहले शहर में हजारों महिलाओं की भागीदारी वाली 'कलश यात्रा' निकाली जाएगी. मुख्यमंत्री सबसे पहले विधायक सरनाईक द्वारा आयोजित भागवत सत्संग सनातन राष्ट्र सम्मेलन में शामिल होंगे और उसके बाद लोकार्पण-भूमिपूजन समारोह आयोजित किया जाएगा. शाम को तीन दिवसीय ₹भागवत सत्संग सनातन राष्ट्र सम्मेलन₹ का समापन होगा. इस अवसर पर जगद्गुरु शंकराचार्य, विभिन्न साधु महंत,. आध्यात्मिक क्षेत्र के विशेषज्ञ उपस्थित रहेंगे. उनकी उपस्थिति में मुख्यमंत्री शिंदे द्वारा कुछ अहम घोषणा करने की संभावना जताई जा रही है.



## इन विकास कार्यों का होगा लोकार्पण

सत्संग सम्मेलन के समापन के बाद सीएम शिंदे मीरा भाईंदर मनपा क्षेत्र में नेशनल हाइवे के पास स्थापित छत्रपति शिवाजी महाराज की अश्वारूढ प्रतिमा, घोड़बंदर किला सुशोभीकरण, हिंदू हृदय सम्राट बालासाहेब ठाकरे आर्ट गैलरी, महान डिजाइनर अप्पासाहेब धर्माधिकारी सभागृह, नवघर तालाब सौंदर्यीकरण और संगीतमय फव्वारा, काशीमीरा जरीमरी तालाब सौंदर्यीकरण और संगीतमय फव्वारा का लोकार्पण करेंगे. इसके अलावा विधायक प्रताप सरनाईक के प्रयासों से राज्य सरकार द्वारा मीरा भाईंदर शहर को दी गई विकास निधि के विभिन्न विकास कार्यों का ऑनलाइन भूमिपूजन अप्पासाहेब धर्माधिकारी हॉल में आयोजित किया गया है.

## 2 शंकराचार्य कार्यक्रम में होंगे उपस्थित

■ भागवत सत्संग सनातन राष्ट्र सम्मेलन में आज तीसरे दिन द्वारकाशारदापीठाधीश्वर जगद्गुरु शंकराचार्य स्वामी श्री सदानंद सरस्वती महाराज, जगद्गुरु शंकराचार्य स्वामी श्री अविमुक्तेश्वरानंद सरस्वती '1008' महाराज, अनंत श्री विभूषित श्री अयोध्या कोसलेस सदन पीठाधीश्वर जगद्गुरु रामानुजाचार्य स्वामी श्री वासुदेवाचार्य 'विद्या भास्कर' महाराज, स्वामी गोविंद देवगिरि महाराज, कोषाध्यक्ष - राम जन्मभूमि तीर्थ क्षेत्र न्यास (अयोध्या), प. पू .बालयोगी श्री सदानंद महाराज, गजानन ज्योतकर गुरुजी (अयोध्या श्री राम मंदिर प्राणप्रतिष्ठ पुरोहित ) उपस्थित रहेंगे और अपने आशीर्वाद एवं मार्गदर्शन देंगे.

■ मीरा भाईंदर शहर के इतिहास में पहली बार जगद्गुरु शंकराचार्य और इतने सारे साधु महंतों का शहर में आगमन हो रहा है. आयोजक विधायक प्रताप सरनाईक ने मीरा- भाईंदर के सभी नागरिकों से 30 सितंबर सोमवार को इस कार्यक्रम में शामिल होने का आग्रह किया है.

# उत्तर भारतीयों को लुभाने में जुटी बविआ

## विधायक क्षितिज ठाकुर ने साधा संवाद

■ **नालासोपारा, (सं).** आगामी विधानसभा चुनाव को देखते हुए सभी पार्टियां उत्तर भारतीय मतदाताओं को लुभाने में जुटी हैं. ऐसे में हिंदी भाषी मतदाताओं का गढ़ कहे जाने वाले नालासोपारा में क्षेत्र में रविवार को बहुजन विकास आघाड़ी के बैनरतले उत्तर भारतीय संवाद, सत्कार समारोह एवं सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित किया गया. उक्त आयोजन पूर्व उपमहापौर उमेश नाईक के मार्गदर्शन में नालासोपारा पूर्व स्थित डिवाइन लाईफ स्कूल में ब्रिजेश शुक्ला (पेंडा) द्वारा किया गया.



## पूर्व महापौर सहित कई लोग हुए शामिल

इसमें मुख्य अतिथि के रूप में बविआ विधायक क्षितिज ठाकुर एवं विशिष्ट अतिथि के रूप में पूर्व महापौर रूपेश जाधव, पूर्व सभापति भरत मकवाना, नीलेश देशमुख, वैभव पाटिल, पूर्व नगरसेवक अरुण जाधव, अमित वैद्य, हाजी नायडू, अमजद अली समानी (भुट्टो), राजेश पाण्डेय उपस्थित थे. इस अवसर पर सभी के लिए उत्तर भारतीय भोजन लिट्टी चोखा का भी विशेष आयोजन किया गया, जिसका सभी ने लुफ्त उठाया. कार्यक्रम को सफल बनाने में पंकज गुप्ता, चंदन विश्वकर्मा, कमल हसन, राहुल सिरसाइ, प्रथमेश सिंह, शुभम सिंह, राजाराम पाटिल, सुनीता दुबे, मीरा दुबे आदि ने सराहनीय योगदान दिया.


CamScanner

N.B.T. पान क्र. 3

# मुंबई के तीसरे सी-लिंक का काम जल्द होगा शुरू

## भाईदर-विरार सी लिंक की डिटेल प्रॉजेक्ट रिपोर्ट तैयार

File Pics



■ वसं, मुंबईः मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (एमएमआरडीए) मुंबई के तीसरे सी-लिंक की डिटेल प्रॉजेक्ट रिपोर्ट (डीपीआर) तैयार करने में जुटा हुआ है। डीपीआर की समीक्षा के साथ ही प्राधिकरण फंड की व्यवस्था में भी जुट गया है। उम्मीद है कि डीपीआर फाइनल होते ही इस सी-लिंक का निर्माण कार्य शुरू कर दिया जाएगा। एमएमआरडीए के एक वरिष्ठ अधिकारी के अनुसार, उत्तन-विरार सी लिंक के डीपीआर की समीक्षा का काम आगामी कुछ दिनों में पूरा कर लिया जाएगा। जल्द ही प्रॉजेक्ट के लिए वित्तीय सहायता का प्रस्ताव भी जापान इंटरनैशनल कोऑपरेशन एजेंसी (JICA) के पास भेजा जाएगा। पहले इस सी लिंक का निर्माण का जिम्मा महाराष्ट्र राज्य सड़क विकास निगम (एमएसआरडीसी) के पास था, लेकिन अब यह जिम्मा एमएमआरडीए को दे दिया गया है।

### प्लान बदला

उत्तन -विरार सी लिंक का निर्माण पहले वर्सोवा से विरार के बीच होने वाला था, लेकिन बीएमसी द्वारा वर्सोवा से उत्तन के करीब तक कोस्टल रोड बनाए जाने की योजना के बाद एमएमआरडीए ने इस सी लिंक के प्लान में बदलाव कर दिया। इसके तहत उत्तन के करीब जहां बीएमसी का कोस्टल रोड समाप्त होगा, वहां से सी लिंक का निर्माण कार्य शुरू किया जाएगा। कोस्टल रोड और उत्तन -विरार सी लिंक एक-दूसरे से कनेक्ट होंगे। कोस्टल रोड और सी लिंक के बन जाने से बांद्रा से विरार का सफर बेहद आसान हो जाएगा। वर्ली-बांद्रा सी लिंक तैयार हो चुका है। वहीं, बांद्रा-वर्सोवा सी लिंक का निर्माण कार्य जारी है। इसी तरह वर्सोवा से विरार के बीच कोस्टल रोड और सी लिंक का प्लान भी तैयार किया गया है।

### परिसर का विकास

जॉयविल शापूरजी हाउसिंग के एमडी श्रीराम महादेवन के अनुसार, उत्तन-विरार सी लिंक, विरार-अलीबाग कॉरिडोर, बुलेट ट्रेन, दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडोर (डीएमआईसी) प्रॉजेक्ट के चलते मुंबई समेत अन्य इलाकों से विरार तक पहुंचना बेहद आसान होगा। बेहतर कनेक्टिविटी होने से परिसर का तेजी से विकास होगा और जिसका लाभ रियल एस्टेट सेक्टर को मिलेगा। घरों की मांग बढ़ेगी। मौजूदा समय में विरार से दक्षिण मुंबई तक पहुंचने में 2 से ढाई घंटे का समय लगता है। पिक आवर में यात्रा की अवधि और बढ़ जाती है। सभी प्रॉजेक्ट के पूरा होने से यात्रा की अवधि घटकर आधे से भी कम रह जाएगी। घंटों का समय मिनटों में पूरा करना संभव होगा।

# बेटी से दुष्कर्म के मामलें में पिता को 20 वर्ष की कैद

■ निसं, मीरा-भाईंदरः नाबालिग बेटी से दुष्कर्म करने वाले पिता को ठाणे सत्र न्यायालय ने दोषी ठहराते हुए 20 वर्ष के कारावास की सजा सुनाई है।



मामला वर्ष 2020 का है, जब उत्तन पुलिस ने 35 वर्षीय पिता के खिलाफ अपनी 9 वर्षीय बेटी के साथ दुष्कर्म का मामला दर्ज किया था। तत्कालीन एपीआई सतीश निकम के नेतृत्व में पुलिस ने मामले की जांच शुरू की और सबूतों के आधार पर एक मजबूत चार्जशीट दायर की। इस मामले की संवेदनशीलता को देखते हुए न्यायालय ने केस को स्पेशल केस का दर्जा दिया। लंबी सुनवाई के बाद ठाणे सत्र न्यायालय ने पिता को बलात्कार का दोषी करार दिया। अदालत ने दोषी को 20 साल कैद की सजा सुनाई। इस मामले में पीएसआई सरंगुले, पैरवी अधिकारी पीएसआई जाधव, कोर्ट कारकून दिलीप सनेर की महत्वपूर्ण भूमिका रही।

N.B.T. पान क्र. 4

# अधूरे ऑडिटोरियम का CM आज करेंगे उद्घाटन!

## मीरा-भाईंदर के 'सनातन राष्ट्र सम्मेलन' में शामिल होंगे शिंदे



ऑडिटोरियम का काम अब भी अधूरा है। यहां जाने के लिए न रास्ता है, न इंटीरियर का काम पूरा हुआ है।

■ निसं, मीरा-भाईंदर: सोमवार को मुख्यमंत्री एकनाथ शिंदे का मीरा-भाईंदर में आ रहे हैं। वह विधायक प्रताप सरनाईक की तरफ से आयोजित 'सनातन राष्ट्र सम्मेलन' में शामिल होंगे। इसके अलावा, मुख्यमंत्री मीरा-भाईंदर में विभिन्न विकास कार्यों का उद्घाटन भी करेंगे, जिसमें अधूरा बालासाहेब ठाकरे ऑडिटोरियम शामिल है।

मुख्यमंत्री मुंबई-अहमदाबाद हाइवे स्थित छत्रपति शिवाजी महाराज की प्रतिमा, नवघर रोड पर म्यूजिकल तालाब, बालासाहेब ठाकरे ऑडिटोरियम, अप्पासाहेब धर्माधिकारी भवन सहित अन्य कामों का लोकार्पण करेंगे।

**अधूरे ऑडिटोरियम का भी होगा उद्घाटन:** सबसे ज्यादा चर्चा गोल्डन नेस्ट स्थित बालासाहेब ठाकरे ऑडिटोरियम के उद्घाटन की हो रही है। ऑडिटोरियम का काम अब तक पूरा नहीं हुआ है। जानकारी के मुताबिक, ऑडिटोरियम का काम 25 से 30 फीसदी तक बाकी है। इसका भूमिपूजन तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे ने किया था। अधूरे ऑडिटोरियम के उद्घाटन को आगामी चुनावों से जोड़कर देखा जा रहा है।

**हिंदीभाषी भवन को मिलेंगे अतिरिक्त 25 करोड़:** शहर में दो मंजिला हिंदीभाषी भवन का नामकरण उत्तर भारतीय भवन होगा। मुख्यमंत्री भवन को अतिरिक्त 25 करोड़ रुपये देने की घोषणा करेंगे। अब उत्तर भारतीय भवन 2 मंजिल का न होकर 9 मंजिला बनेगा। इसका निर्माण 60 हजार वर्गफीट में होगा।

# मीरा-भाईंदर कांग्रेस इकाई की बैठक संपन्न



■ निसं, मीरा-भाईंदर: रविवार को मीरा-भाईंदर कांग्रेस इकाई की बैठक संपन्न हुई। बैठक में बूथ स्तर के पदाधिकारी और कार्यकर्ता मौजूद थे। कार्यक्रम में ठाणे निरीक्षक संजय जोसेफ, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष मुजफ्फर हुसैन और जिलाध्यक्ष प्रमोद सामंत ने कार्यकर्ताओं का मार्गदर्शन किया। जोसेफ ने कहा कि लोकसभा चुनाव परिणाम से कार्यकर्ताओं में उत्साह है और विधानसभा चुनावों में कांग्रेस का प्रदर्शन शानदार होगा। हुसैन ने कहा कि कांग्रेस की बढ़ती लोकप्रियता से दूसरे दलों के नेता कांग्रेस में आने के मार्ग तलाश रहे हैं। सामंत और कार्यकर्ताओं ने मीरा-भाईंदर विधानसभा सीट से हुसैन की उम्मीदवारी की मांग की। विश्वस्त सूत्रों का कहना है कि महा विकास आघाडी की तरफ से हुसैन की उम्मीदवारी तय हो चुकी है।

# 78 साल के बुजुर्ग पर यौन उत्पीड़न का लगा आरोप

■ निसं, विरार: विरार पुलिस स्टेशन क्षेत्र में 78 वर्षीय बुजुर्ग पर पड़ोस में रहने वाली 8 साल की बच्ची के यौन उत्पीड़न का आरोप लगा है। बच्ची की मां की शिकायत पर पुलिस ने आरोपी को गिरफ्तार कर लिया है। कल्याण की रहने वाली 30 वर्षीय महिला बेटी को लेकर विरार में रहने वाले बीमार पिता को देखने आई थी। वह पिता के घर पर थी और उसकी बेटी पड़ोस में रहने वाले बुजुर्ग के घर पर खेल रही थी। इस बीच, बुजुर्ग ने लड़की के साथ अश्लील हरकतें की। बच्ची ने यह बात मां को बताई। इसके बाद मां ने पुलिस से जाकर शिकायत की। बेटे की मौत के बाद उसकी बहू उसे छोड़कर चली गई और वह अकेला रहता है। पास में उसकी बेटी रहती है, जो उसकी देखभाल करती है।

Hindustan Times P-9

{ CRIME IN MIRA-BHAYANDER-VASAI-VIRAR }

# 310 cases of vehicle theft in last 8 months in MBVV

Surge in demand for cheap vehicles in rural areas and lack of parking spaces led to these thefts

**Megha Sood**
megha.sood@hindustantimes.com


**MUMBAI:** Vehicle thefts are soaring in the Mira-Bhayander-Vasai-Virar (MBVV) area. Police statistics indicate that the number of car and bike thefts is significantly more than the past year, which saw 200 thefts—this year, at least 310 cases have been registered in the last eight months. HT did a deep dive to find out the reasons behind the increase and what the crime syndicate does with the stolen vehicles.

MBVV officers said there were several reasons for the increase in thefts. "There is a huge demand for cheap vehicles in the rural areas, where vehicles can be sold without any paperwork," said a police officer. The lack of marked parking spaces, the increasingly sophisticated modus operandi of the thieves and the involvement of interstate gangs have made the thieving process simpler.

## Theft on the rise

**WHAT TO DO IF YOUR VEHICLE IS STOLEN**

In the event of a vehicle theft, victims should promptly inform both the police and the insurance company. They should submit essential documents, including the FIR copy, vehicle registration certification and driver's license to the insurer. In some cases, they may also need to provide the original car keys. If the police fail to locate the vehicle within the stipulated time frame, they will issue a Non-Traceable Certificate. The insurer will then settle the claim based on the terms and conditions specified in the insurance policy.







**VEHICLE THEFTS IN MUMBAI**

**3,058** Vehicles stolen in 2022

**2,671** Vehicles stolen in 2023

**4,259** Vehicles recovered by police




### No official parking spaces

In September last year, the MBVV traffic police identified 300 spots for a project to fight illegal parking in the twin cities. A year later, the project has failed to take off, for which the police hold the civic bodies, which failed to put up signage, responsible.

The project was launched since residents, plagued by a lack of parking spaces on internal roads, had been urging the government to allocate official parking spots. "In the absence of these, four-wheelers and two-wheelers are being parked in remote lanes and bylanes," said a resident. An offshoot of this is that the vehicles become more vulnerable to theft.

### Thieves using modern tech

Officers said that car thieves were constantly updating their skills, which put even modern state-of-the-art vehicles at risk. These vehicles are equipped with advanced safety features, including keyless entry operating through a barcode embedded in the windshield. Thieves exploit this technology by scanning the barcodes and sharing the codes offshore, enabling them to unlock cars and even gain remote access.

### Inter-state gangs involved

According to the police, which recently nabbed a gang and recovered 47 vehicles, the gang's strategy after stealing a vehicle involved inter-state work. Such gangs first forge documents and register stolen vehicles in north-eastern states like Arunachal Pradesh and Nagaland. Later the registration is transferred to Maharashtra Regional Transport Offices (RTO) for sale under different registration numbers in different parts of the state. Avinash Ambure, deputy commissioner, crime branch, said that the recently arrested accused were part of a much larger gang, and efforts were on to track the other members. "Buyers should insist on seeing all documents while purchasing a second-hand vehicle and make sure that the vehicle was not stolen," he said.

The free Press Journal P-7

Hindustan Times - P-6

# Man held for cheating in rental car scam

**Suresh Golani**
MIRA BHAYANDAR

The crime detection unit attached to the Kashigaon police have arrested a notorious cheat who hired cars from online car rental portals like Zoom app and conned potential buyers by creating an impression that the vehicle was owned by him which he intended to sell.

According to the police, the accused Mustafa Rashid Khan, 32, is a real estate agent who doubled up as a dealer of second-hand cars. He had recently cheated two potential buyers to the tune of Rs.6 lakh by showing them a same Maruti Ertiga car, which he had hired for two days through a free car rental app to book self-drive cars.

After receiving the complaint, the crime detection unit led by senior police inspector Rahul Kumar Patil under the supervision of DCP (Zone I) Prakash Gaikwad started investigations. On the virtue of electronic surveillance, the police apprehended Khan from Naigaon.

## Recently duped two potential buyers of ₹6 lakh by showing them same vehicle

Investigations revealed that Khan was a notorious cheat having cases registered against him at various police stations – Naya Nagar, Kasarwadavli and Kashimira. The accused would establish contact with potential buyers who search used vehicles, which are listed for sale on websites. He would then send photographs of the car and strike a deal. However, after accepting the money, he would disappear. Notably, he would return the car to its original owner after duping his targets.

Meanwhile an offence under sections 318(4) (cheating and dishonestly inducing the delivery of property) and 316(2) (criminal breach of trust) of the Bharatiya Nyaya Sanhita (BNS) has been registered. The police said that they have taken up the further investigation.

# ACB ARRESTS FOREST LAW ENFORCEMENT OFFICERS

**Megha Sood**
megha.sood@htlive.com

**MUMBAI:** Palghar's Anti-Corruption Bureau (ACB) arrested a forest ranger and a forest security officer of the Vasai Forest department for allegedly demanding Rs 1.30 lakh from a landowner seeking permission to put up additional doors for his chawl that would face the Mumbai-Ahmedabad Highway.

According to ACB officers, the accused, identified as Pannalal Beldar, 35, and Pankaj Saner, 45, were posted at the forest office in Gokhiware. They were arrested on Saturday following the complaint of the landowner.

The landowner told the police that he owned a chawl in Vasai East near the Mumbai-Ahmedabad highway. His chawl has three entrances facing away from the Highway. On September 15, he decided to construct an entrance facing the highway. He already started the construction works when Beldar summoned him to the forest range office. The accused informed him that the chawl falls under the forest land, and additionally constructing doors in the direction of the highway would be a violation of the forest department laws, so he must demolish the entrances.

When the landowner pleaded to spare him, Beldar demanded Rs 1.30 lakhs from him. The landowner was able to give them Rs 90,000 on that day and requested time till Saturday to pay the rest. He then approached the Waliv police and registered a complaint against the two. After the Palghar ACB were informed about the case, they laid a trap to catch the forest rangers red-handed accepting Rs 40,000.

A police officer from the Palghar ACB said, "We have arrested the two and will produce them before the court for accepting bribe."